MHPU180001102010

## निशाणी क्र.१५९ वरील आदेश
## (दिनांक १९.०१.२०२३)

१. प्रस्तुत अर्ज वादी क्र. २ब तर्फे मयत वादी क्र. ३ तानाजी राघु उर्फ राघोबा मोरे यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी दाखल केलेला आहे. त्यांचे असे कथन आहे की, वादी क्र. १ ते ८ यांनी प्रतिवादी यांच्याविरुध्द जाहीर ठरावासाठी व निरंतर मनाईकरीता दावा दाखल केलेला आहे. दावा न्यायप्रविष्ठ असतांना वादी क्र. ३ तानाजी राघु उर्फ राघोबा मोरे हे दि. १०/०४/२०२१ रोजी मुंबई येथे कोरोना रोगाच्या काळात मयत झाले आहे. त्यांच्या नावापुढे मयत वारस असा शब्द लिहुन त्यांचे वारस म्हणुन वादी क्र. ३अ श्रीमती सुरेखा तानाजी मोरे – पत्नी, वादी क्र. ३ब श्री. रोहन तानाजी मोरे – मुलगा, वादी क्र. ३क म्हणुन सौ. विना राजेश कांबळे – मुलगी असे वारस रेकॉर्डवर घेण्याची परवानगी मिळावी. या कारणास्तव त्यांनी अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

२. प्रतिवादी क्र.१५ यांनी सदर अर्जावर जबाब लिहुन दिला आहे. त्यांचे असे कथन आहे की, वादीस र.रु. १०,०००/– कॉस्टचा हुकूम करुन ती रक्कम प्रतिवादी क्र. १५ यांना देण्यास सांगुन अर्ज मंजुर करण्यास हरकत नाही.

३. प्रतिवादी क्र. १४ यांचेविरुध्द दावा एकतर्फा चालविण्याचा आदेश दि. १६/०७/२०१४ रोजी तसेच प्रतिवादी क्र. ५अ ते ५क विरुध्द दावा एकतर्फा चालविण्याचे आदेश दि. १२/०४/२०१८ रोजी झाले आहे. तसेच प्रतिवादी क्र. २, ३, ४, ६ ते १३ यांचेविरुध्द दावा विनाकैफियत चालविण्यात येण्याचा आदेश दि. १२/०४/२०१८ रोजी झालेला आहे.

४. वादीतर्फे विद्वान वकील श्री. एस.बी.चव्हाण व प्रतिवादी क्र. १५ तर्फे विद्वान वकील श्री. बी.व्ही.देशमुख यांचा सविस्तर युक्तिवाद ऐकला.

५. अभिलेखाची पडताळणी केली असता असे दिसुन येते की, दि. ०३/०४/२०१० रोजी वादी क्र. १ ते ८ यांनी प्रस्तुत दावा जाहीर ठराव व निरंतर मनाईकरीता दाखल केला आहे. दि. ०७/०४/२०१० रोजी दाव्यास क्रमांक पडलेला आहे. त्याचदिवशी प्रतिवादींना समन्स काढण्याचे आदेश झालेला आहे. दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. १५ यांनी नि. १०३ अन्वये त्यांची कैफियत व जबाब दाखल केलेला आहे. माझे पुर्वाधिकारी यांनी दि. १३/०७/२०१८ रोजी नि. १०७ अन्वये मुद्दे काढलेले आहे. त्यानंतर दावा वादीच्या पुराव्याकरीता नेमण्यात आला. वादी क्र. १ विश्वनाथ राधु उर्फ राघोबा मोरे यांनी त्यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दि. ०१/१०/२०१८ रोजी नि. १०८ अन्वये दाखल केलेले आहे. त्यांचा पुढील सरतपास व उलटतपास होण्यापुर्वी वादी क्र. १ हे दि. ०३/११/२०२० रोजी मयत झाले व त्यांचे नावापुढे मयत असे लिहुन त्याचे वारस म्हणुन १अ

ते १ड यांना दाव्यात सामील करुन दुरुस्ती केलेली आहे. प्रतिवादी क्र. १ कोंडाबाई सोनवणे दि. २३/०७/२०१८ रोजी मयत झालेली आहे. त्यांचे वारस रेकॉर्डवर न घेतल्यामुळे दावा त्यांचे विरुध्द अबेट झाल्याचा आदेश माझे पुर्वाधिकारी यांनी दि. १२/०६/२०१९ रोजी झालेला आहे. तो आदेश रद्द करण्यासाठी वादीतर्फे दि. १९/०६/२०१९ रोजी अबेटमेंट सेट असाईडचा अर्ज दाखल केलेला आहे व उशीर माफीचा अर्ज दाखल केलेला आहे. परंतु त्या दोन्ही अर्जावर कोणतेही आदेश झालेले नाही. प्रतिवादी क्र. २ चंद्रकांत राघु उर्फ राघोबा मोरे हे दि. ३१/१०/२०१८ रोजी मयत झाले. नि. १२१ वरील आदेशानुसार प्रतिवादी क्र. २ चे वारस म्हणुन प्रतिवादी क्र. २अ ते २क यांना दाव्यात सामील करुन तशी दुरुस्ती झालेली आहे. त्यानंतर दि. ०८/११/२०२२ रोजी वादी क्र. २ब यांनी प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे. अर्जातील कथन विचारात घेतले असता दि. १०/०४/२०२१ रोजी वादी क्र. ३ मयत झाले. नि. १५४ वरील मृत्यु प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता तानाजी राघोबा मोरे हे दि. १०/०४/२०२१ रोजी मयत झाल्याचे दिसते. त्यानंतर दि. १९/११/२०२२ पावेतो त्यांचे वारस वादीतर्फे घेण्याचा अर्ज दि. १०/०४/२०२१ ते दि. २८/०२/२०२२ चा कालावधी वगळता ९ महिने व ९ दिवसांचा विलंब दिसुन येतो. दावा हा निरंतर ताकीद व जाहीर ठराव याकरीता दाखल केलेला आहे. नि. १५५ व १५७ वरील आदेशाच्या अनुषंगाने वादी क्र. ३ चे वारस रेकॉर्डवर घेणे आवश्यक आहे. उपरोक्त सर्व विवेचन, कारणास्तव प्रस्तुत अर्ज मंजुर होण्यास पात्र ठरतो. करीता मी खालील आदेश करीत आहे.

## आदेश

१. अर्ज नि.१५९ मंजुर करण्यात येतो.

२. वादींनी नि. १५५ व १५७ वरील आदेशाची पुर्तता झाल्यानंतर दाव्यामध्ये वादी क्र. ३ च्या नावापुढे मयत वारस लिहुन वादी क्र. ३अ श्रीमती सुरेखा तानाजी मोरे, वादी क्र. ३ब श्री. रोहन तानाजी मोरे, वादी क्र. ३क म्हणुन सौ. विना राजेश कांबळे यांची नावे, वय, व्यवसाय व पत्ता लिहुन आजपासुन १४ दिवसांच्या आत दुरुस्ती करावी तसेच दावा दुरुस्तीची प्रत दाखल करावी.

३. वर नमुद १ व २ बाबींची वादी क्र. २ब व त्यांच्या वकिलांनी नोंद घ्यावी.

JYOTI BHARAT GOYAL
Digitally signed by JYOTI BHARAT GOYAL
Date: 2023.01.19 16:06:19 +0530

(श्रीमती. जे.एस.खेडकर–गोयल)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, दौंड
ता.दौंड, जि. पुणे

दि.१९.०१.२०२३

C E R T I F I C A T E

"I affirm that the contents of this PDF file judgment/order are same word for word as per original order"

| | | |
|---|---|---|
| Name of the Steno | :- | P.D.Jagatap |
| Court name | : | Smt. J. S. Khedkar-Goyal,<br>J.M.F.C, (Court no.1), Daund,<br>Tq.Daund, Dist.Pune |
| Order date | : | 19/01/2023 |
| Order signed by | : | |
| Presiding Officer on | : | 19/01/2023 |
| Order uploaded on | : | 20/01/2023 |